**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण** प्रारंभ

**बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र**

जा.क्र.कडोंमपा/नरवि/बांप/क.वि/ २७गावे/२०१८-१९/०२
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,कल्याण
दिनांक :- ०७/०४/२०१८

प्रति,

**श्रीमती. हौसाबाई एन्. भाने व इतर आणि श्री.गंगाराम एन्.भानगडे व इतर यांचे**
**कु.मु.प.धा.–मे. डावखर इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. तर्फे संचालक, श्री.संतोष सोपान डावखर व इतर–१**
**व्दारा– श्री. जॉन वर्गीस (वास्तु), कल्याण (प.)**
**स्थापत्य अभियंता – श्री. मनोहर पाटील, ठाणे.**

विषय:– **स.नं. ३३, हि.नं.९ व १०, मौजे–पिसवली, कल्याण(पूर्व)** येथे बांधकाम प्रारंभ करण्याच्या मंजूरीबाबत.

संदर्भ:– वास्तुशिल्पकार श्री. जॉन वर्गीस यांचा दि. २७/०२/२०१८ रोजी सादर केलेला प्रस्ताव क्र.४२०१.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार **स.नं. ३३, हि.नं.९ व १०, मौजे–पिसवली, कल्याण(पूर्व)** मध्ये **२८००.०० चौ.मी.** क्षेत्राच्या भुखंडावर **२५९०.७७ चौ.मी.** चटई क्षेत्राचा विकास करावयास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दिनांक २७/०२/२०१८ च्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे **'रहिवास'** इमारतीच्या बांधकामाबाबत, **'बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र'** देण्यात येत आहे. इमारतीच्या व जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कुठलाही वाद निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी आपण जबाबदार रहाल. या अटींवर हे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**इमारत क्र.१ – बेसमेंट, स्टिल्ट, तळ मजला (पै.) + पहिला मजला ते सहावा मजला + सातवा मजला(पै.) (रहिवास)**

**नगररचनाकार, (डों.वि.)**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.**

१) हे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिल्याचे तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध असेल,नंतर पुढील वर्षासाठी मंजूरीपत्राचे नूतनीकरण मुदत संपण्याआधी करणे आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांच्या व नियोजित विकास योजने अनुषंगाने छाननी करण्यात येईल.
२) नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरूस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.
३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.
४) ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमीनीव्यतिरिक्त अन्य जमीनीवर बांधकाम/विकास करण्यास हक्क देत नाही
५) इमारतीचे बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशांप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटींप्रमाणे करता येईल.
६) वाडेभिंत व जोत्याचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे वाडेभिंतीचे व जोत्याचे बांधकाम केल्या–बाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे, व ते या कार्यालयाकडून तपासून घेऊन "जोता पूर्णत्वाचा दाखला" घेण्यात यावा व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे.
७) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये,तसे केल्याचे आढळून आल्यास सदरचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल.
८) इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफटी) जबाबदारी सर्वस्वी आपले वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद याचेवर राहिल.
९) नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ मधील तरतूदी प्रमाणे जागा बाधित होत असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलेवर राहिल.
१०) भूखंडाकडे जाण्या–येण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहिल.बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र नियोजित रस्त्याप्रमाणे दिले असल्यास त्या रस्त्याचे काम महानगरपालिकेच्या सोयी प्रमाणे व प्राधान्याप्रमाणे केले जाईल व तसा रस्ता होईपर्यंत इमारतीकडे जाणाच्या येणाच्या मार्गाची जबाबदारी सर्वस्वी आपली राहिल.
११) सदर जागेत विहीर असल्यास ती संबंधित विभागाच्या परवानगी शिवाय बुजवू नये.
१२) सदर जागेतून पाण्याचा नैसर्गिक निचरा होत असल्यास तो जलनि:सारण विभाग, (क.डों.म.पा.)च्या परवानगीशिवाय वळवू अथवा बंद करु नये.